? AUG 2023 सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# गुणवंत महाविद्यालयांचे प्राचार्य, अधिविभागप्रमुख यांचा गौरव

▶ सकाळ वृत्तसेवा



कोल्हापूर : संत गजानन महाराज कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगच्या प्राचार्य डॉ. एस. एच. सावंत यांचा सत्कार कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांच्या हस्ते झाला. यावेळी शेजारी एम. एस. देशमुख, एस. एस. महाजन, प्रमोद पाटील, विलास शिंदे, अजितसिंह जाधव आदी उपस्थित होते.

कोल्हापूर, ता. ३ : शिवाजी विद्यापीठ गुणवत्ता शिष्यवृत्तीप्राप्त विविध नऊ गुणवंत महाविद्यालयांचे प्राचार्य आणि एका अधिविभागांच्या प्रमुखांचा विद्यापीठातर्फे गौरव करण्यात आला. विद्यापीठातील निलांबरी सभागृहात कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांच्या हस्ते प्राचार्य, अधिविभागप्रमुखांचा प्रशस्तीपत्र, विद्यापीठ ग्रंथ, शाल, श्रीफळ देवून सत्कार झाला.

पदव्युत्तर प्रवेश विभागातर्फे आयोजित समारंभात आण्णासाहेब डांगे कॉलेज ऑफ बी.फार्मसी (आष्टा, जि. सांगली), संत गजानन महाराज कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग (महागाव, ता.गडहिंग्लज), श्री. व्यंकटेश महाविद्यालय (इचलकरंजी), डी. आर. माने महाविद्यालय (कागल), श्री. यशवंतराव चव्हाण वारणा महाविद्यालय (वारणानगर), भोगावती महाविद्यालय (कुरूकली), शहाजी लॉ कॉलेज (कोल्हापूर शहर), पद्मभुषण डॉ. क्रांतीवीर नागनाथ अण्णा नाईकवडी कला महाविद्यालय (झरे), यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ सोशल वर्क (जकातवाडी, सातारा) यांचा गौरव झाला.

प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, डॉ. एस. एस. महाजन, एम. एस. देशमुख उपस्थित होते. प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांनी प्रास्ताविक केले. अभिजीत लिंग्रस यांनी सूत्रसंचालन केले. उपकुलसचिव भक्ती नाळे यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

4 AUG 2023 सकाळ



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ आणि क्रिडाई कोल्हापूर यांच्यात सामंजस्य करार झाला. या वेळी कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, 'क्रिडाई'चे अध्यक्ष के. पी. खोत, प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, डॉ. एस.एन. सपली, गिरीश कुलकर्णी आदी उपस्थित होते.

# विद्यापीठ- 'क्रिडाई'मध्ये करार

कोल्हापूर, ता. ३ : शिवाजी विद्यापीठाचा तंत्रज्ञान अधिविभाग आणि क्रिडाई कोल्हापूर यांच्यात सामंजस्य करार झाला. बांधकाम क्षेत्र, उद्योगाला आवश्यक कुशल अभियंते, ज्ञान व तंत्रज्ञान यांची निर्मिती करणे, विद्यार्थ्यांना औद्योगिक प्रशिक्षण देणे हा कराराचा हेतू आहे.

विद्यार्थ्यांनी सामाजिक, पर्यावरणीय प्रश्न घेऊन त्या अनुषंगिक प्रकल्प हाती घ्यावेत व त्याची उकल करण्यास 'क्रिडाई'ने सहकार्य करावे, असे आवाहन कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांनी केले. तंत्रज्ञान अधिविभागातील विद्यार्थ्यांना सद्य:परिस्थितीत बांधकामातील ज्वलंत प्रश्नांची जाणीव होऊन त्यांना प्रत्यक्ष बांधकामाचा अनुभव 'क्रिडाई'च्या माध्यमातून मिळेल, अशी ग्वाही 'क्रिडाई'चे अध्यक्ष के. पी. खोत यांनी दिली. प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, तंत्रज्ञान अधिविभागाचे संचालक डॉ. एस. एन. सपली, डॉ. गिरीश कुलकर्णी यांनी, तर 'क्रिडाई'तर्फे अध्यक्ष खोत, सचिव संदीप मिरजकर यांनी स्वाक्षरी केल्या.

या वेळी डॉ. व्ही. एस. पाटील, श्रीकांत भोसले, 'क्रिडाई'चे सहसचिव गणेश सावंत, विजय माणगांवकर, विश्वजित जाधव, आदित्य बेडेकर उपस्थित होते. तंत्रज्ञान अधिविभागातील सिव्हिल शाखेचे समन्वयक महेश साळुंखे यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. पुनश्री फडणीस यांनी आभार मानले.

पुण्यनगरी

# शिवाजी विद्यापीठाचा क्रिडाईसमवेत सामंजस्य करार

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाचा तंत्रज्ञान अधिविभाग आणि क्रिडाई, कोल्हापूर यांच्यात नुकताच सामंजस्य करार करण्यात आला. उद्योगांना आवश्यक कुशल अभियंते, ज्ञान व तंत्रज्ञान यांची निर्मिती करणे, विद्यार्थ्यांना औद्योगिक प्रशिक्षण देणे, असा या सामंजस्य कराराचा हेतू आहे. विद्यार्थ्यांनी सामाजिक, पर्यावरणीय प्रश्नांच्या अनुषंगिक प्रकल्प हाती घ्यावेत व त्याची उकल करण्यास क्रिडाई संस्थेच्या माध्यमातून आवश्यक ते सहकार्य उपलब्ध करून द्यावे, असे आवाहन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांनी याप्रसंगी केले.

तंत्रज्ञान अधिविभागातील विद्यार्थ्यांना सद्यःपरिस्थितीत बांधकामातील ज्वलंत प्रश्नांची जाणीव होऊन त्यांना प्रत्यक्ष बांधकामाचा अनुभव क्रि डाईच्या माध्यमातून मिळेल, अशी ग्वाही क्रिडाईचे अध्यक्ष के. पी. खोत यांनी दिली. विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ.



प्रमोद पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत विद्यापीठातर्फे प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, तंत्रज्ञान अधिविभागाचे संचालक डॉ. एस. एन. सपली व डॉ. गिरीश कुलकर्णी यांनी, तर क्रिडाईतर्फे अध्यक्ष के. पी. खोत व सचिव संदीप मिरजकर यांनी स्वाक्षरी केल्या.

तंत्रज्ञान अधिविभागातील सिव्हील शाखेचे समन्वयक महेश साळुंखे यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. पुनश्री फडणीस यांनी आभार मानले. यावेळी डॉ. व्ही. एस. पाटील, श्रीकांत भोसले, क्रिडाईचे सहसचिव गणेश सावंत, विजय माणगावकर, विश्वजित जाधव व आदित्य बेडेकर उपस्थित होते.

पुढारी

# क्रांतिसिंह नाना पाटील यांना अभिवादन

कोल्हापूर : क्रांतिसिंह नाना पाटील यांची जयंती शिवाजी विद्यापीठात उत्साहात साजरी करण्यात आली. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या हस्ते क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, अजित चौगुले, डॉ. महादेव देशमुख, डॉ. तानाजी चौगुले उपस्थित होते.

सकाळ

# क्रांतिसिंह नाना पाटील यांना अभिवादन

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्या हस्ते क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, प्रभारी वित्त व लेखाधिकारी अजित चौगुले, मानव्यशास्त्र विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. महादेव देशमुख, राष्ट्रीय सेवा योजना समन्वयक डॉ. तानाजी चौगुले, विद्यार्थी विकास विभागाचे प्रभारी संचालक डॉ. प्रकाश गायकवाड, डॉ. प्रकाश राऊत, प्राणीशास्त्र अधिविभाग प्रमुख डॉ. आशिष देशमुख, डॉ. माधुरी वाळवेकर, महादेव भिलावे, सुनील गायकवाड, ए. डी. गोफणे, वाय. के. माने, जे. के. सुरकुले, एस. पी. माने, एस. आर. पवार, डी. ए. पोतदार, पी. आर. चौगुले उपस्थित होते.

सकाळ

# शिवाजी विद्यापीठ

लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त शिवाजी विद्यापीठात अभिवादन कार्यक्रम झाला. कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांच्या हस्ते प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आले. या वेळी प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, प्रभारी वित्त व लेखाधिकारी अजित चौगुले, मराठी अधिविभाग प्रमुख डॉ. नंदकुमार मोरे, अण्णा भाऊ साठे अध्यासनाचे प्रमुख डॉ. रणधीर शिंदे, क्रीडा संचालक डॉ. शरद बनसोडे, ज्ञानस्रोत केंद्र संचालक डॉ. धनंजय सुतार, उपग्रंथपाल डॉ. प्रकाश बिलावर आदी उपस्थित होते.

सकाळ

# रेशीम शेतीशास्त्र अभ्यासक्रम उपलब्ध

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या प्राणीशास्त्र विभागामधील रेशीम-शेतीशास्त्र विषय बंद केल्यास तीव्र आंदोलनाचा इशारा महाराष्ट्र नवनिर्माण विद्यार्थी सेनेने बुधवारी दिला. त्यावर सेरिकल्चर स्पेशलायझेशन विषय विद्यापीठात उपलब्ध आहे. याबाबत काहींच्या मनात संभ्रम निर्माण झाला. त्यामुळे अभ्यासक्रम उपलब्ध असल्याचे सर्वांना कळविण्यात येत असल्याची माहिती विभागप्रमुख डॉ. आशिष देशमुख यांनी आज दिली. संबंधित विषय पुन्हा सुरू करावा अन्यथा तीव्र आंदोलनाचा इशारा 'मनविसे'च्या शिष्टमंडळाने दिला.

त्याबाबतचे निवेदन कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांना दिले. त्यानंतर सेरिकल्चर स्पेशलायझेशनसह आठवी उत्तीर्ण शेतकरी वर्गाला रेशीमशास्त्र पदविका, तर पदवीधर विद्यार्थ्यांसाठी रेशीमशास्त्राची पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रम उपलब्ध असून त्यासाठी अर्ज करण्याची अंतिम मुदत ३० सप्टेंबरपर्यंत असल्याची माहिती डॉ. देशमुख यांनी आज दिली.

लोकमत

# 'रेशीमशास्त्रा'साठी ३० सप्टेंबरपर्यंत मुदत

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या प्राणिशास्त्र अधिविभागात सेरिकल्चर स्पेशलायझेशन अभ्यासक्रम एम.एस्सी.च्या विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध आहे. रेशीमशास्त्र पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रमासाठी अर्ज करण्याची ३० सप्टेंबरपर्यंत अंतिम मुदत आहे. याचा लाभ घ्यावा, असे आवाहन प्राणिशास्त्र अधिविभाग प्रमुख डॉ. आशिष देशमुख यांनी केले.

क्रांतिसिंह

# विद्यापीठात दूरशिक्षण केंद्राच्यावतीने उद्बोधन वर्ग

कोल्हापूर(प्रतिनिधी):-शिवाजी विद्यापीठातील दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र मार्फत शैक्षणिक वर्ष २०२३ - २४ साठी बी.ए.,बी.कॉम.,एम.ए. (मराठी हिंदी, इंग्रजी, इतिहास, अर्थशास्त्र, राज्यशास्त्र व समाजशास्त्र) एम.कॉम.,एम.एस्सी. (गणित) व एम.बी.ए. या अभ्यासक्रमाची प्रवेश प्रक्रिया सुरू आहे. या अनुषंगाने शिवाजी विद्यापीठातील सर्व वर्ग- ३ व वर्ग- ४ मधील प्रशासकीय सेवकांसाठी राजर्षी शाहू सभागृह येथे उद्बोधन वर्गाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी समन्वयक प्रा. डॉ.के.बी. पाटील यांनी उद्बोधन वर्ग घेतला. डॉ. पाटील म्हणाले की,शैक्षणिक जाणीव जागृती निर्माण करण्यासाठी उद्बोधन वर्ग महत्वाची भूमिका पार पडत असतात. ज्ञान, वृत्ती आणि कौशल्य विकसित करण्यासाठी व प्रशासकीय पदोन्नतीसाठी दूरशिक्षण आवश्यक आहे. शिवाय ही शिक्षण विषयक जाणीव जागृती कुटुंबातील घटक, व समाजातील विविध घटक यांच्यासाठी उपयुक्त आहे. त्यामुळे दूरशिक्षण पद्धतीचा लाभ आपण घेतला पाहिजे. यावेळी डॉ. प्रवीण लोंढे यांनी प्रवेश प्रक्रियेतील ऑनलाईन अर्ज भरणेबाबत प्रात्यक्षिक दाखविले

पुढारी

# एम.फिल., पीएच.डी. कोर्सवर्कची २८ ऑगस्ट रोजी परीक्षा

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठातर्फे मार्च-एप्रिल २०२३ या सत्रातील एम.फिल., पीएच.डी. कोर्सवर्कची सुधारित परीक्षा २८ ऑगस्ट रोजी घेण्यात येणार आहे.

विद्यापीठाने याबाबतचे परिपत्रक नुकतेच काढले आहे. यापूर्वीच्या आदेशानुसार एम.फिल., पीएच.डी. कोर्सवर्क परीक्षा ७ ऑगस्ट रोजी सुरू होणार होती; परंतु अभ्यासक्रम स्ट्रक्चर व स्टँडर्ड ऑफ पासिंगमधील प्रश्नपत्रिकेच्या स्वरुपात बदल करण्यात आला आहे.

या परीक्षेच्या तारखेत बदल करण्यात आल्याची माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी दिली.

तरुण भारत

# एम. फिल., पीएच. डी. कोर्सवर्क परीक्षा २८ ऑगस्टपासून

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ अंतर्गत मार्च-एप्रिल २०२३ सत्रातील एम. फिल, प्री-पीएच. डी. कोर्सवर्क परीक्षा २८ ऑगस्टपासून सुरू होणार आहेत. यापूर्वी ७ ऑगस्टपासून परीक्षा सुरू होणार होत्या. परंतु तांत्रिक कारणाने या परीक्षेच्या तारखांमध्ये बदल केला आहे. त्यामुळे या परीक्षा २८ ऑगस्टपासून सुरू होणार आहेत, याची विद्यार्थ्यांनी दखल घ्यावी, असे आवाहन परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी केले आहे.